# बहुरूपी

विलास सिंदगीकर

पारगावच्या लोकांनी गरामसभेत गरामीन पाणीपुरवठा व स्वच्छता समिती स्थापन केली. पुऱ्या गावानं एकमुखानं समितीला पाठिंबा दिला. बहुमतानं समिती पास झाली. टाळ्या पिटल्या. अन् समिती कामाला लागली.

अन् बघता बघता पारगाव विविध सहकारी संस्थेच्या मोकळ्या जागेवर पिण्याच्या पाण्याची उंच टाकी बांधून काढली. गावची लोकसंख्या एक हजार व्हती म्हणून त्या परमानात भारत निरमान योजनेच्या वतीनं सरकारकडून तीस लाख रुपये मिळाले. कारण गावाला कायमस्वरुपी पाणी मिळावं; म्हून बापूसाब दिवानजीनं कागद करून योजना मंजूर करून घेऊन पाण्याची टाकी बांधून काढली व्हती; पण पाण्याची टाकी बांधल्या दिसापास्नं बंदच व्हती. कारण त्यांनी ज्या ठिकाणी हिरीचं पाणी टाकीला जावं म्हुन पाण्यासाठी हिर खोदल्ती, त्या दिसापास्नं हिरीत पाण्याचा एक थेंबसुदीक पाणी लागलं न्हाई. तीस फूट खोल हिर खोदल्ती; पण कोरडीठ्याक पाषाण हिर न्हायल्ती. म्हुन गावच्या लोकांना पिण्याचं पाणी मागायचा परस्नच येत नव्हता.

शासनाची योजना व्हती. गावचे पुढारी आणि अधिकारी भाऊ भाऊ आन् सगळ्या गरीब लोकांना लुटून खाऊ असं सरकारचं धोरण झालेले. म्हुन सम्दे सरकारचे अधिकारीबी लाचखाऊ झालेले. गरामीन पाणी



पुरवठा समितीच्या लोकांनी अधिकाऱ्याचे खिसे गरम करून बिल काढून घेतले. त्यांनी या योजनेत बक्कळ पैसा खाल्ला ते गावच्या पुऱ्या लोकांना म्हाईत हाय; पण त्यांच्या इरोधात बोलायला कुणाचीबी जीभ रेटली न्हाई. रस्त्यावरचं आंबडत भांडण घरात का घ्यावं; म्हुन मुक्याच्या भावासारखे सम्दे लोक मूग गिळून गप्प बसलेले.

आता त्या पाण्याच्या टाकीच्या भोवताली बाभळीची छोटी मोठी झाडं वाढली व्हती. तिथं झाडाशिवाय गावचं काळं कुत्रंसुदीक फिरकत नसे. फकस्त बाभळीच्या झाडाची वस्ती; पण त्या मोकळ्या जागेवर सुगीच्या दिसात भटक्या विमुक्त जातीजमातीची वीस-पंचवीस पालं उतरायची. सुगी असेपर्यंत भटके लोक पाल ठोकून ऱ्हात, गावोगावी जावून सुगी मागून आनत, अन् सुगी संपली की दूरदेशी निघून जायची. तवा ती जागा मोकळीच ऱ्हायची. दुःखाला सुख मानून जगणारी पालं; यंदाबी आगद करून उतरली व्हती. आनंदान ऱ्हात व्हती.

त्या संस्थेच्या जागेवर उतरलेली पालं एका जातीजमातीची नव्हती. वैदू, कुडमुडे जोशी, कोल्हाटी, डोंबारी, डवरी गोसावी, मदारी, गोपाळ, बुरूड, कंजारभाट, बेलदार अशी न्हाई न्हाई त्या जातीजमातीचे लोक गुण्यागोविंदानं नांदत व्हते. त्यांच्या जातीजमाती वेगळ्या, रितीरिवाज वेगळे, भाषा वेगळी, संस्कृती वेगळी, पोषाकसुदीक अलगच. अन् प्वॉट भरण्याचे धंदे वेगळे व्हते. त्यांचे कधीमंदी कोल्हेकुही केल्यासारखे पेवून खावून भांडण व्हत; पण कुण्या पंचाविना भांडण मिटत असत. कधी पोलीस स्टेशन न्हाई की कोर्ट न्हाई. तिथं लई मोठी भानगड झालीच; तर माळेगावच्या जत्रेत जातपंचायत दंड लावून खर्च वसूल करीत असे. म्हुन कुणीही एकमेकाच्या इरोधात भांडण करीत नव्हते; ते सर्व लोक आनंदानं ऱ्हात व्हते.

त्यांच्या पालाची रचनाही अलग अलग केली व्हती. ज्यानं त्यानं दरसालची आपापली जागा पकडून पालं ठोकलेली. काहींचे पाल ताडपत्रीचे, काहींचे मेनकापडाचे, तर त्यातील काहींनी वेगवेगळ्या ठिगळांच्या गोधड्या पांघरून निवारा केला व्हता. काहीजण धोंड्याचं गोल रिंगन करून त्यात उघड्यावर ऱ्हात व्हते; पण ती सगळी पालं एका रांगेत उभारली व्हती. गावच्या रचनेसारखीच जातवार पालांची उभारणी केल्ती. त्यांच्या जगण्याचा येवसायबी वेगवेगळा व्हता. ज्याला स्वतःच्या जीवनाचा सार माहीत न्हाई, तो मान्साचं भविष्य सांगणारा पिंजऱ्यातील पोपट घेऊन फिरायचा. कुणाकडं माकडं; तर कुणी महादेवाचा नंदी पाळलेला. डोंबाऱ्याचं आख्खं कुटुंबच खेळ करायला गावात जात असे. कुणी भल्या पहाटे जाई; तर कुणी दिस निघाल्यावर जाई. कुणी दिस कासऱ्यावर आला की भीक मागून आणायला जात असत. प्रत्येकजण दारोदार भीक मागून रातीला तांड्यावर पालाच्या आडोशाला यायचा. महालात झोपल्यावाणी समाधानाची ढेकरं देत झोपायचा.

तर रोजच्यासारखंच आजबी उजाडलं. पालांना जाग आली. भटक्या मान्साचा दिनक्रम सुरू झाला. पालावरची सारी मान्सं सकाळच्या वक्ताला वेगवेगळ्या गावाला भीक मागून आनायला निघून गेली, पण भिमा सावंत आणि त्याचं पोरगं म्हादू पालातच व्हते. भिमा सावंत डवरी गोसावी व्हता. तो स्वतःला मातर नवनाथ पंथाचा वंशज समजायचा.

भिमा अंगापिडानं धिप्पाड गडी; सहाफूट उंचीचा व्हता. नाकीडोळी नीटस, गव्हाळ रंगाचा व्हता. त्यानं आज पोलीस

अधिकाऱ्याचा पोषाख घातला. कुर्ता पँटात खुपसून इन केला. त्यावरून मोठा पट्टा लावला. कंबरेच्या पट्याला कातड्याचे खोकं आडकावून; त्यात नकली पिस्तोल ठुवला. डोक्यावर फौजदारसाहेबासारखी टोपी घातली. डाव्या काखेत छोटी डायरी, उजव्या हातात फौजदार साहेबाचा रूळ, पायात विटकरी रंगाचा बूट नि डोळ्यावर आंधळ्या मान्सानं चष्मा घातल्यासारखा मोठ्या भिंगाचा काळा चष्मा घातला. कोचार मिशा सरळ केला. दाडीवरूनबी हात फिरवला. भिमा हुबेहुब पोलीस अधिकाऱ्यासारखा दिसू लागला. आज त्याच्या मनानं बहुरूपी म्हुन गोसावी बनून जायचं व्हत, पण त्यांच्याकडे वाजवायचं सामान नव्हतं. त्या सारंगीचा तार तुटला व्हता. म्हुन त्यांना नाईंदर बणून जावावं लागत व्हतं. तो मनात कायबाय इचार करीत आस्ताना त्याचं पोरगं म्हादू पोलीसाचा पोषाख घालून तयार झालं. त्यानं काखेत झोळी आडकावून हातात पोलीस काठी घेतली. काखेत लाकडाची मोठी बंदूक आडकावून गाव मागायला निघाले

''कंच्या गावाला जावूत?''

भिमानं पोराला इचारला; तेवढ्यात मदारी गोवशा तिथं आला. दोघा बापलेकांना बघून म्हणाला,

''आरं बॉऽ तुमी गावात गेलो न्हाई का ?''

''आमी आता निघालूच नव्हका नांदगावला.''

असं म्हणून भिमानं पोराला परस्न् इचारला,

''ठाणेदाराचा कागुद संगट ठुलास का न्हाई?''

''न्हाई.''

''आरं रांडच्या, कागुद घरात ठेवून काय उपेग हाय. कागुद घरात ठुवून खार घालायचा हाय का कागुदचा.

''ध्यानातच आलं न्हाई.''

''आरं, पुलीस कंदी लगट येल; त्याचा का नेम हाय. तिथं वलंबी जळतंय आन वाळलंबी जळतंय. संगट कागुद ठुला न्हाई; तर दोघाला हाकनाक चिरट्याच्या खाईत लकापमंदी सडत पडाव लागल रातरभर.''

''व्हय... व्हय... तू म्हंतुस ते बी बराबर हाय. म्या कागुद संगट घेतो.''

म्हादूनं डब्यातून कागद काढून घेऊन खिशात ठेवला. अन् दोघं बापलेक बहुरूपी बतावणी करून भीक मागायला नांदगावला निघाले.

पारगाव ते नांदगाव दोन-तीन मैलाचा आंतर व्हता. नांदगावला जायला कच्चा रस्ता; त्या रस्त्यावर दगडाची गिट्टी आंथुरलेली. तो रस्ता कसला ? खड्यानंच रस्ता जोडला व्हता. पायपीट करीत तासाभरात गावला पोचले. गावातल्या लोकांना वाटलं; गावात पोलीसच आलेत. त्यांना गावात आलेलं बघून लोक मारक्या म्हशीसारखं टकमक बघू लागले. रस्त्यात गोट्याचा डाव मांडलेली बारूकसी लेकरं ढुंगणावरची चड्डी सरळ करीत सांदुऱ्यासांदुऱ्यानं धूम पळू लागली. काही धीट लेकरं पोलिसांच्या पोषाखातील बहुरूपींना बघून म्हनू लागली,

''आरं बबन्या, अबे तिकडं बघ.''

''काय?''

''गावात कोण आलंय ते बघ.''

''कोण म्हंजी बे?''

गण्या त्या पोलीसाच्या डरेसातील बहुरूप्याकडे बोट करून म्हणाला,

''कोलीत यालेत बे गावात.''

''कुठं हाईत रं ?''

''पारगावच्या रस्त्यानं येत्यात.'' गण्यानं पारगावच्या रस्त्याकडं नजर टाकला. तसं बबन्या नाकातील शेंबूड हाताच्या हातानं पुसीत बोलला,

''गण्या रं ऽ मायच्यान बे, कोलीत लई लंबरी मान्सं ऱ्हात्यात म्हणं. त्यानी आपुल्याला

मारल्यावर कसं कराव, बापू?''
''मग काय कराव रऽ?''
गण्यानं परस्न् इचारला.''
''आपुण साळेला निघून जावूत.''
''व्हय, व्हय, रातीला झोपताना मही माय म्हणीत व्हती कुठं की पुलाखाली घालायला लोक बारकी लेकरं चोरून न्हेत हाईत म्हणं.''
गण्यानं पोटातील गोष्ट उघडी केली. तसं दोघा दोस्तांनी गोट्याचा डाव मोडला. अन् थेट शाळेचा रस्ता धरला.
भिमा सावंत आण म्हादू ऐटबाज चालत गावात आले. नांदगावला चालत आल्यामुळं गुडग्यापस्तूरचा प्यांट रस्त्याचा फुपडा उडून भरला व्हता. त्यांच्या फाटलेल्या बुटातून बाहेर आलेल्या पायाच्या बोटाला घाम फुटून मातीचा चिखल झाला व्हता. दोघांनी सरळ गावात परवेश केला; पण त्यांच्याजवळ कुणीबी गावचा येईना झाला. कारण नांदगावच्या अप्पाराव देशमुखाची सून हिरकनीबाई बारव हिरीत पडून मेली व्हती. त्यासाठी गावात पोलीस आले असावेत, असा लोकांचा गैरसमज झाला व्हता. म्हुन कुणीबी लोक त्यांच्याजवळ येईना गेले. त्यांना बघताच रस्त्यात, चौकात, वट्यावर बसलेले आणि दारात उभा टाकलेले लोक गुपचूप पसार हाऊ लागले. अप्पाराव देशमुखांची सून कशापायी मेली? याचा शोध लावण्यासाठी पोलीस बहुरूपी लोकांचं सोंग घेऊन गावात आले असावेत, असं म्हुन गावातले कळते लोकबी निघून जावू लागले.
गावातल्या चावडीतील चौकात बालाजी सोनावार सावकाराचं किराणा मालाचं दुकान व्हतं. त्या दुकानाकडंच भिमा आणि म्हादू वळले. दुकानात गेल्यावर बसून सावकाराचं बारकं पोरगं कांचन गिऱ्हाईक करीत बसला व्हता. पोलीसांच्या पोषाखातील मान्सांना बघून सावकाराचं पोरगं कावरंबावरं झालं. त्या पोराला बघून भिमा सावंतने सावकाराच्या टेबलावर रूळ आपटीत बतावणी करीत म्हादूला म्हणाला,
''देशमुख, साऱ्या दुकानाची झडती घ्या?''
भिमानं दुकानाची झडती घेण्याचा आदेश दिला. तसं त्या सावकाराचं पोरगं मोठ्यानं वरडलं,
''बापाजी, मला वाचवाऽऽ!''
कांचन चिरकल्याचं आयकून बालाजी सोनावार सावकाराने मोठ्यानं घाबरून लेकराला इचारला,
''बाळाऽ काय झालं रेऽऽ?''
''पोलीस...''
भिमानं टेबलावर पुन्हा रूळ जोरानं आपटून आदेश दिला,
''देशमुख, या दुकानाला सील मारा!''
तेवढ्यात बालाजी सोनावार सावकार देवपूजा आर्धवट सोडून मधल्या घरातून दुकानात आले. तसं त्यांना बघून भिमा म्हणाला,
''या दुकानचे मालक कोण?''
''म्या... म्या... या दुकानचा मालक हाय बघा.''
''दुकानच्या नावाची पाटी कुठं दिसत न्हाई?''
''न्हाई.'' सावकाराच्या तोंडाची बोबडी वळली.
''दुकानच्या नावाची पाटी का लावली न्हाई?''
''......''
बालाजी सोनावार सावकार गप्पगार झाला. त्याला कायबी सुदरना झालं. म्हुन भिमा म्हणाला,
''आमी दुकानची चवकशी करायला आलोय. मालात भेसळ करून इकताय. रास्त भाव दुकानातून तांदूळ घेऊन मान्सांना कितीबी भावात इकता तुमी. वजनमापाला शिक्का मारून घेतला न्हाई. शासणाची परवानगी घेऊन माल इकत न्हाई. मनमानेल तसं गरीब मान्साची लूट करताय म्हुन आलोय.''

''इथं बसा, माझं थोडं आयकून घ्या.''

बालाजी सावकारानं भिमाला बसायला खुर्ची दिली.

''आमी इथं बसायला आलो न्हाई.''

''थोडं आयकून घ्या.''

''मला वेळ न्हाई.''

दोघांचं बोलणं चालू व्हतं. तेवढ्यात सहा-सात वर्षाचं लेकरू हातात चिमणी घेऊन आलं. सावकाराला चिमणी नि पैसे देत म्हणालं,

''सावकार, एक छटाक गास्तेल द्या.''

''आरं पोरा, इथं राकेल मिळत न्हाई.''

''आपण रॉकेल विनापरवाना इकताय; तो किती मोठा गुन्हाय, याची जाणीव हाये का तुम्हाला?''

''म्या राकेल इकत न्हाई.''

बालाजी सावकारानं घाबरून कपाळावरचा घाम पुसला. तो सावकार खोटं बोलत व्हता. कारण सावकाराकडं रास्तभाव दुकानबी व्हतं; पण सावकार राशनच गावाला आनत नव्हता. दोन महिन्यातून एकदा माल आनायचा. आन तेबी बेभाव इकायचा. म्हणून भिमा म्हणाला,

''तुमी दुकानदार लोक न्हाई न्हाई ते काळेधंदे करताय. आन सांगता रॉकेल इकत न्हाई म्हुन. तुमच्यासारखे लोक मोटारगाड्यांना चोरून रॉकेल इकत असता काय? देशमुख, या दुकानची झडती घ्या. दुकानातल्या सर्व सामानांची यादी करून घ्या.''

म्हादू डायरीत नोंद करून घेत असल्याचं नाटक करू लागला. तसं बालाजी सावकार गयावया करू लागला तो हात जोडून इनवणीच्या सुरात म्हणाला,

''अहो सायब, तुमचा काय तरी गैरसमज झालाय बघा. म्या मायंदळ चांगला माणूस हाय. म्या कायबी गैर वागत न्हाई. या गावात माझ्याबद्दल कुणाच्याबी मनात काडीची शंका न्हाई की तक्रार न्हाई बघा.''

सावकाराच्या या बोलण्यावर भिमानं त्याला दम दिला,

''या गावात कायबी तक्रार न्हाई! गावाला आलेला माल बेभावानं इकून लुबाडताय. साखर, तेल आणि तांदूळ चढ्या भावानं इकताय. सावकार, तुरुंगात टाकल्यावर पोपटावाणी खरं सांगाल का न्हाई?''

मग भिमाचं पोरगं म्हादू बोलला,

''साहेब, सावकाराच्या दुकानावर बंदी घालून टाका.''

''नका... नका... सायब, म्या तुमच्या पाया पडतो. माझ्या दोन पोरी लगनाच्या हाईत. तुमी अस्लं कायबी करू नका?''

सावकार धडपडले. त्यांनी भिमाचे पाय धरले.

''माझे पाय धरायला मी काय देव न्हाई.''

भिमानं सावकाराला उठविलं. तसं सावकार हात जोडून भिमाला म्हणाले,

''सायब, माझ्या दुकानाला सील ठोकू नका. म्या तुमी जे मागाल ते द्यायला तयार हाई. जे काय ते इथंच मिटवून टाका. म्या पाच हजार रुपये द्यायला राजी हाव बघा. आता दोन हजार रुपये देतो. आन् बाकीचे सोमवारी येवून देतो.'' असं म्हणून सावकारनं घरातील तिजोरीतून दोन हजार रुपये काढून आनले आणि भिमाच्या खिशात गुपचूप घालू लागला.

''तुम्ही मला रिसवत देता का? जेलमंदी टाकल्यावर कसं कराल?''

''दोन हजार रुपये हाईत.''

''पैसेच द्यायचे, तर पाच हजार रुपये द्यायचे व्हते.''

''घरात व्हते तितके दिलाव बघा.''

''या खिशातले आगुदर रुपये काढून घ्या. न्हाईतर जेलमंदी पाठवीन.''

घाबरून सावकारानं भिमाच्या खिशातले दोन हजार रुपये काढून घेतले आन् भिमानं सावकाराला

इचारलं,

‘‘गावात दारूचे दुकान चालते का?’’

‘‘मला कायबी म्हाईत न्हाई.’’

बालाजी सावकार हात जोडून उभा टाकला. त्याच्या घशाला कोरड पडली. भिमाला खरोखर तो सावकार घाबरलेला दिसला. सावकाराचं संपूर्ण अंग थरथर कापू लागलं व्हतं. सावकाराला काय तर व्हईल म्हुन भिमानं खरखुरं सांगून टाकायचं ठरविलं. तो सावकाराला म्हणाला,

‘‘तुमी घाबरू नका मालक. म्या पोलीस सायब न्हाई. आमी डवरी गोसावी हाय. बहुरूपी सोंग करून मागून खाणारे लोक. तुमी पसाखोंगा वाढेल ते मागून खाणारे; बतावणी करून जगणारे भटके हाव.’’

‘‘आरं गड्याऽ तुमी मला पईलच सांगावं का न्हाई रं? म्या तुमाला किती घाबरलो व्हतो.’’

सावकारानं सुटकेचा श्वास घेतला. बालाजी सावकारानं खुशीनं भिमाला पन्नास रुपये दिले. भिमा आनंदी झाला अन् पुढचं घर मागण्यासाठी निघून गेला.

तेवढ्यात गावात नाईंदर आल्याचं हानम्यानं बघला. त्यानं दोन-चार ढेंगात बहुरूपी भिमाला गाठला.

‘‘सायब, कोंच्या गावाहून आलाव?’’ हानम्यानं इचारला पण भिमानं आयकून आयकल नसल्यावाणी केलं. भिमाला हानम्याच्या वागण्यावरूनच तो आगाव असावं, असं वाटलं. म्हणून भिमानं त्याला बोलण्याचं टाळलं.

हानम्या लई अवलाई पोरगा व्हता. अख्ख्या गावात वाया गेलेला. कुणी घोटभर दारू पाजली की त्याचेच गुणगान गात फिरणारा. काम करायचा न्हाई, धंदा करायचा न्हाई. भाकरकुटका खाल्ल्याबरुबर गावात जावून बसायचा अन् रातीला बायकोला मरुजेकना मारायचा. म्हून त्याच्या असल्या फालतू वागण्याला कंटाळून बायकू माहेरी निघून गेली व्हती. त्या दिवसापास्नं हानम्या दिसभर मोकाट कुत्र्यासारखा गावभर फिरत व्हता. आपलं बोलणं नाईंदरानं आयकलं न्हाई असं ध्यानात येताच तो पुन्हा भिमाला म्हणाला,

‘‘आरं येऽ नाईंदरहो, तुमी कोंच्या गावचे हावत रंऽ?’’

‘‘आमी पारगावच्या परकोटात उतरलाव बघा.’’

मग हानम्यानं त्यांना पुन्हा दरडावलं,

‘‘माझी थट्टा करताव का रं?’’

‘‘आमी कशाला थट्टा कराव जी, पाटील.’’ भिमा वरमून उत्तरला.

‘‘म्याबी तुमाला कुठं धमकीत बोलताव. म्याबी तुमची थट्टाच करतुया.’’

‘‘मग तुमची गाडी कुठं सोडलीया?’’

‘‘गाडी हागनदारीत सोडलीया, पर डिझेल पंपावर हाय.’’ तेवढ्यात हानम्यानं भिमाच्या कमरेच्या नकली पिस्तोलला हात घातला. तसं भिमा ओशाळून म्हणाला,

‘‘एऽ, या पिस्तुलला हात लावल्यावर आटक करून सासुरवाडीत नेहून बसवीन. पाच हजार गोळ्यांचा पिस्तुल हाय. पिस्तुल इथं, पर गोळ्या कारखान्यात हाईत.’’

‘‘आरं गड्या, ते जावू द्या. म्या सांगतो ते काम करा.’’ असं म्हून तो पुढं बोलू लागला.

‘‘गावात एक बाई हाय. ती सोताच्या सुनेला मायंदाळ तरास दितीया. म्या सांगल तसंच बोलून दम भरायचा.’’

‘‘म्या गरीब माणूस हाय जी. आमी आस्लं अगावू काम केल्यावर लोक आमाला गावातून हाकलून लावतील बघा.’’

‘‘तुमी कायबी घोर करू नका. म्या तुमच्या संगंच ऱ्हातो.’’ हानम्यानं भिम्याला काय काय बोलायचं ते सगळं सांगून टाकलं. न्हाई केल्यावर दोघांना जीवं

मारण्याची धमकी दिली.

पन्नास वर्षांची सारजामाय उंचीला पाच-साडेपाच फूट व्हती. मध्यम बांधा, नाकात नथ, गोऱ्या रंगाची व्हती. अंगावर नऊवारी लुगडं कास्टा घालून नेसल्ती. अंगात चोळी, गळ्यात काळ्या मन्याची पोत नि बोरमाळ घातली व्हती. कानात सोन्याची फुलं आणि कपाळावर भलंमोठं कुकू लावलेलं. तिच्या नाकातला गुंड चमकत व्हता. ती वसरीत दाणं फडकत बसली व्हती. सारजामाय दाणे निसाल्ती. ती दाणे निसता निसता बाहेर नजर टाकली. तसं पोलिसाच्या पोषाखातील दोन मान्सं घराकडं येत असलेलं बघून वरमली. डोक्यावरचा पदर सरसा केली. तिला बघताच भिमानं हातातली डायरी उघडून वाचल्यासारखं करीत सारजामायला म्हणाला,

''मी तुमच्या पोराच्या नावानं अटक वॉरंट घेऊन आलोय. पोराच्या बायकोनं पोलिसात तक्रार दिली हाये. आमी त्याला आटक करून तुरुंगात टाकणार हावोत. पईलं पोराला ताब्यात द्या. न्हाईतर आमी तुमालाच जेलची हवा खायला घेऊन जावू.''

''आमी अख्ख्या गावात धुतल्या तांदळावाणी हाय बघा. घरातसुदीक कधी नवराबायकूचं भांडण झालं न्हाई. बरीक त्या ल्योक भाड्याचं मडं गेलं. त्योच नीट आस्ता तर एवढं कशाला लागलं आसतं. ती बायकू रांडबी खज्याळ निघाली. त्याच्या तोंडाला तोंड लावीत बसली. आन् आमच्या मागं सनी लागली.'' असं म्हनून सारजामाय रडू लागली.

''एऽ बाय, इथं रडण्याचं नाटक करू नका. मी असल्या खूप बायका बघितल्यात.''

भिमा पोराला म्हणाला, ''देशमुख, त्या बाईचं म्हननं नीट नोंदवून घ्या.''

मग म्हादू डायरीत लिहिण्याचं नाटक करू लागला. तसं सारजामाय लई घाबरली. ती हात जोडून त्यांना म्हणाली,

''म्या तुमच्या पाया पडते. पण मला जेलात नेवू नका.''

''मग तुमी आगुदर मुलाला पकडून द्या.''

''सायब, तुमी त्याला सोडून द्या. म्या तुमची कोंचीबी आट मानायला राजी हाय.''

''पोराला सोडून देण्यासाठी एक हजार रुपय लागतील.''

''सायब, म्या आता देते जी.'' असं म्हून सारजामायनं कंबळातले एक हजार रुपये काढून दिले. पण भिमानं पाया पडून घेतलं न्हाई. तिच्या डोळ्यांत पाणी तराळलं. सारजामाय रडत असलेली बघून भिमा म्हणाला,

''सारजामाय, तुमी बिलकूल घाबरू नका. म्या फौजदार न्हाई आन म्हादू पोलीस न्हाई. नाईंदराचा आमचा खानदानी छंदा हाय बघा. आमी कधी चोरी करीत न्हाई, लबाडी करीत न्हाई, पिढ्यान् पिढ्या वाडवडलापास्नंच धंदा हाई. पोलिसाच्या डरेसात नाईंदर बनून प्वाट भरण्यासाठी भीक मागत दारोदार फिरतात. म्या तुमच्या लेकराला वळखीतसुदीक न्हाई.''

''मग पयलंच सांगायचं न्हाई का? म्या किती घाबरले व्हते.''

''मावशी, आमाला माफ करा. आमी प्वाटाला पसाखोंगा भीक मागून खाणारी मान्सं हाव बघा. पर त्या पोरानं मारतो म्हून दमदाटी केल्यानं हे नाटक कराव लागलं.''

भिमानं झाडाच्या आड लपलेल्या मान्साकडं बोट दाखवत उतरला. तसं झाडाच्या आड लपलेला हानम्या पळत घरात आला. त्यानं आल्याबरुबर भिमाच्या हातातील एक हजार रुपये हिसकावून घेतले आणि खिशातून दहा रुपयाची नोट काढून बहुरूपी भिमाला दिली. त्यांच्याकडं बघत भिमाला म्हणाला,

''आता तुमचं काम झालं.

म्या सासुरवाडीला जावून बायकूला घेऊन येणार न्हाई. काय मायऽ?'' असं म्हून त्यानं मायला लाडानं मिठी मारली. तसं त्याची माय हानम्याला लटक्या रागानं म्हणाली,

''तुझा बोंदा बसवला नेव्हणं.''

''तुमी निघा इथून...''

हानम्यानं भिमाला जाण्याची खूण केली आणि भिमानं तिथून काढता पाय घेतला.

दुपारची वेळ. सारं गावरान तापलेलं. सारं गावजीवन रानशिवारात पसार झालेलं. उन्हावाऱ्याच्या झळया साऱ्या गावाशिवारातून फिरायलेल्या. अन् रानपाखरं झाडाच्या फांद्याआड तोंड वासून ल्हाकत बसल्याली. भाजत्या रस्त्यावरून भिमा नि त्याचं पोरगं म्हादू वाड्यावाड्याच्या म्होरं भाकरभाजी मागत फिरू लागले. घरी असलेलं लोक वाढू लागले, तर कुणी पुढच्या दारी पाठवू लागले. सात-आठ घरं मागितल्यावर त्यांनी नांदगाव सोडायचं ठरवलं.

नांदगावच्या खाल्तं लमानतांडा व्हता. त्या तांड्यावर वुलूसं मागून पारगावला जावं असा इचार करीत ते लमानतांड्याकडं निघाले.

नांदगाव आणि लमानतांड्याच्या मध्यभागी एक मळा लागला. नांदगावपास्नं अर्धा मैल लांब. त्या वाटेतल्या मळ्यात हीर व्हती. त्या हिरीजवळ गेले. कारण त्या हिरीवर जाऊन भाकरकुटका खावा, मग म्होरचा रस्ता धरावा म्हणून ते दोघं रस्ता सोडून मळ्यात आले. त्यांनी मळ्यात सगळीकडं नजर टाकली. तवा त्या मळ्यात कुणीच नव्हतं, पण हिरीपास्नं थोड्या अंतरावर उंबराच्या झाडाखाली एक माणूस बसला व्हता. त्या झाडाखालच्या मान्साला भिमानं इच्यारलं,

''मालक, इथं आमी जेवण करावं काय?''

''आरं बाबा, तुमी कोण हाव... तुमी इथं कशाला आलाव रं?''

''जेवण करून पाणी प्यावं म्हून आलोय जी.''

''तुमी कोण?''

''आमी डवरी गोसावी लोक हाव बघा.''

''आरं, मला वाटलं तुमी होमगार्डच हाव कायकी? या हिरीत देशमुखाची सून मरून पडलीया. इतक्यात पोलीसगाडी येईल. आन न्हाई ते झेंजाट तुमच्यामागं लागेल. तुमी इथून बिगीनं काढता पाय घ्या. न्हाईतर हाकनाक मरून जाल.''

''बरं मालक...'' भिमा पडत्या आवाजात उत्तरला.

दोघा बापालेकानं हिरीत मरून पडलेल्या बाईला वाकून बघितलं. तेव्हा त्यांच्या अंगाला घाम फुटला. हिरीत बाई मरून पडलेली बघून त्यांना कसंतरीच झालं. न्हाई ती ब्याद अंगावर येईल, म्हून त्यांनी तिथून पटकन काढता पाय घेतला. तेवढ्यात मळ्याच्या बाहेर भिमा पडतंय तेवढ्यात दोन पोलीसगाड्या आल्या त्या दोन मोटारसायकलवर चार पोलीस बसून आले. पोलिसांना बघताच दोघा बापलेकांची घाबरगुंडी उडाली. चपापले. भिमानं खाली मान घालून रस्ता गाठला, पण ते खाली मान घालून जात असलेलं बघून जमादारसाहेब त्यांना दरडावत म्हणाले,

''आरे, तुम्ही कोण आहात? या विहिरीवर काय करीत होता? तुम्हाला विहिरीवर कोणी पाठवलंय? पोलिसांचा पोशाख घालून कुणाकुणाला लुबाडीत फिरताय?''

''म्या... म्या...'' भिमाचा आवाज बंद झाला.

तसं जमादार गणेशराव पांडेंनी त्यांना पुन्हा दरडावलं,

''शेळीसारखा म्या... म्या... काय करतो आहेस? तुला विहिरीवर कोणी पाठवलं?''

''कुणीबी पाठवलं न्हाई. आमी भाकरकुटका खावं म्हून

हिरीवर आालाव बघा.''
''तुमी कोण आहात?''
''सायब, आमी डवरी गोसावी हाय. नवनाथ महाराजाच्या पंथाचे. आमी नाईंदराचं सोंग घेऊन गावोगाव भीक मागत फिरताव. हा खानदानी धंदा हाय आमुचा.''
भिमाच्या या बोलण्यावर गणेशराव पांडेसाहेबांनी पोलिसांना आदेश दिला, ''आरे मुंडे, या बहुरूप्याला बेड्या घाला. साल्याचा या खुनात काहीतरी संबंध दिसतोय. म्हणून तो विहिरीजवळ आलाय.''
''न्हाई... न्हाई... मागतकरी लोक हाव आमी. आमचा आन् बाईच्या मढ्याचा कायबी संबंध न्हाई.''
''मग तुम्ही या विहिरीवर काय आलात?''
''भाकरकुटका खावा म्हून आलतो.''
''गायकवाड, साहेबांची जीपगाडी येईपर्यंत यांना झाडाखाली बसवून ठेवा.''
''सायब, आमी कायबी केलं न्हाई.''
''मग तू खोटं का बोलतो आहेस?''
''म्या कशापायी खोटं बोलू? म्या खरं तेच सांगत हाय. या हिरीवर पाणी प्यायला मिळंल म्हून जेवायला आलो व्हतो.''
''साहेब, यांना सुंद्रीचा झटका दाखवा आणि सासरवाडीत नेहून बसवा. मग खरं काय ते सांगून टाकतील.'' गावच्या पोलीस पाटील उत्तमराव पवारांनी जमादारसाहेबांच्या बोलण्याला पुष्टी दिली.
भिमा आणि त्याचं पोरगं म्हादू घाबरले. खरंच भिमा गरीब माणूस व्हता. तो हसवणाऱ्याला रडवायचा आन् रडवणाऱ्याला हसवायचा. त्याच्या घराची पिढ्यान् पिढ्यापासूनची ही कला व्हती. बतावणी करून जगणारा भिमा. त्यानं कुणाला कधी तरास दिला न्हाई. त्यालाबी कुणी हाटाकलं न्हाई. भिमाबी कुणाचा गैरफायदा घेऊन मागून घेत नव्हता. कुणाला जबरदस्ती करीत नव्हता. लोक जे भीक वाढतील तेवढंच घेत जगत हुता. त्यांना पोलीस खात्याकडून बहुरूपी बतावणी करून घेऊन दाखवण्यासाठीचा दाखला मिळाला व्हता. म्हणून तो गावोगावी बहुरूप्याचं सोंग करीत फिरायचा. पण त्याच्यावर आज भयंकर प्रसंग गुदरला व्हता. त्याला पुढं आड आन् मागं हीर दिसली व्हती. तो रडकुंडीला आला. त्याचं डोळं आसवांनी भरून आलं. तसं भिमा साहेबांचे पाय धरीत म्हणाला,
''आमी पुलीसचा डरेस घालून फिरताव. बरीक कुणालाबी तरास देत न्हाई. प्वॉटाची गार मायंदाळ मोठी. ती जाग्यावर बसू देत न्हाई सरकार. म्हून प्वॉटासाठी दारोदार हिंडाव लागतंया. जातीनं सांगितलेली बारा सोंगं करूनच जगताव. जातीचा नियम मोडता येत न्हाई. आमी हा धंदा सोडल्यावर जातपंचायत आम्हाला वाळीत टाकतीय सरकार. आमी काय करून जगावं ते तुमीच सांगा.'' असं म्हणून भिमा मटकन खाली बसला. गणेशराव पांडे साहेबांम्होरं गडबडा लोळू लागला. सोडून देण्यासाठी विनवणी करू लागला. थोबाडीत मारून घेऊ लागला.
''तुझे नाटक पुरे झालं.'' साहेब म्हणाले.
''म्या नाटक करीत न्हाई. म्या कधी लांडीलबाडी केली न्हाई. चोरी केली न्हाई. आमी वाईटवखटं वागल्यावर जातपंचायत आमाला माफ करीत न्हाई बघा. गतसाली म्हाद्याची बायकू दुसऱ्याचा हात धरून निघून गेली. सून निघून गेल्यानं जातपंचायतनं दंड लावलाय. तो दंड भरायचा हाई. मह्या म्हाद्याला एक पोरगं हाय. त्याला दोन साल झालीत. त्याचा सांभाळ माझी बाईल करीत न्हाई. जातपंचायतीला बकरं आन् दारू दिल्याबिगर मह्या पोराला बायकू

म्हून कुणीबी पोरगी देणार न्हाई.''

भिमा स्वतःच्या जलमाची गोष्ट कथन करीत व्हता. म्हाद्या अवघडल्यासारखा बाजूला थरथर कापत उभा राहिलेला.

जमादार गणेशराव पांडेसाहेब भिमाला प्रश्न इचारीत व्हते आन् भिमा खाली मान घालून बोलत व्हता. भरल्या डोळ्यानं साहेबाकडं नजर टाकत व्हता. म्हाद्याच्या डोळ्यांतूनबी घळाघळा पाणी गळू लागलं व्हतं.

''सायब, एवढी बार मला माफी करा. म्या हिथं हिरीवर यायला नकू हुतं. मला माफ करा. मला सोडून द्या. मह्या जातपंचायतला पोलिसांनी मला बसवून ठुलं व्हतं. म्हून कळल्यावर काय तर गुन्हा केलाय. तवा पोलिसांना बसवलं व्हतं. याला वाळीत टाका म्हंतील. मला मरतकूळ दिसात बट्टा लावू नगसा. मला जातीत मरू द्या. सरकारनं मला माफी द्यावी. पुना म्या असली चूक कंदीच करणार न्हाई.'' पुन्हा भिमानं सायबांचे पाय धरले.

''तुझं नाव काय?'' साहेबांनी प्रश्न केला.

''म्या भिमा गोच्या सावंत आन् ह्यो मह्य पोरगं म्हादू सावंत हाय. आमी दोघं एकूच धंदा करताव.''

''त्या हौदातील पाणी बकिटात घेऊन मोटारसायकल धुवून काढा. फौजदारसाहेब आल्यावर काय ते बघू.''

दोघं बापलेक उठले. हौदाच्या जवळचं बकीट घेऊन पाणी आणलं. जोर लावू लावू मोटारगाडी धुऊ लागले.

एक दीड तासानंतर पोलिसांनी विहिरीतून अप्पाराव देशमुखांच्या सुनेचं प्रेत बाहेर काढलं. तिच्या शरीरावरच्या मारल्याच्या खुणा तपासल्या. तिचं अंग बघू बघू लिहू लागले. तिच्या मृतदेहाचा पंचनामा केला. आता फक्त फौजदारसाहेब येऊन तपासण्याचा अवकाश व्हता. सर्व पोलीस फौजदारसाहेबांच्या गाडीची वाट बघत बसतो.

आणि गणेशराव पांडेसाहेबांनी बहुरूपी भिमाकडे मोर्चा वळवला. त्यांनी बहुरूपी मोटारगाडी धूत असलेलं बघून थंडगारच पडले. कारण त्यांनी मोटारसायकल उताणी करून धुऊ लागले व्हते. त्यांचे अडाणीपणाचे धुणे बघून साहेबांना रागही येत व्हता आणि त्यांची कीवही करावी वाटत व्हती. म्हणून ते भिमाला रागानं म्हणाले,

''आरे हरामखोरांनो, तुम्हाला गाडी कशी धुवावी याची अक्कल आहे का?''

जमादार गणेशराव पांडेसाहेब त्यांच्यावर भडकले. भिमा, त्याचा मुलगा म्हादू गुन्हेगारासारखे साहेबाम्होरं मान खाली घालून उभा राहिले. तसा जमादारसाहेबांनी हुकूम दिला,

''मोटारसायकल सरळ उभी करा.''

''बरं जी.'' असं म्हणून दोघांनी मोटारसायकल सरळ उभी केली.

''मी तुम्हाला सोडून देतो आहे. पण यापुढे तुम्ही मला अशा ठिकाणी सापडायचं नाही. काय?''

दोघा बापलेकांनी नंदीबैलासारखी होकाराची मान हलवली.

''आता तुम्ही निघा...''

त्यांनी असं म्हणताच भिमा आणि म्हादूनं सुटकेचा निःश्वास घेतला. त्यांच्यावरचं संकट टळलं. पोलिसांच्या तावडीतून त्यांची सुटका झाली. भाजीभाकरीचं गाठोडं उचलून ते पालाकडे निघाले. प्वॉटात भुकेचा कल्लोळ माजला व्हता. अंगात ताकद नव्हती, पण जमादारसाहेबांनी सोडून दिल्याबरुबर त्यांच्या अंगात एकाएकी बळ संचारलं. त्या बहुरूपी मान्सांनी एका झटक्यात पारगाव गाठलं, पण त्यांनी पालात जाईस्तोर मागं फिरून नांदगावचा रस्तासुदीक बघितला न्हाई. ◘